सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. मलेअ-१७२५/प्र.क्र.१५८/मातं, दि. २४/०७/२०२५.

**विषय** :- राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रांबाबत सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. मलेअ-१७२५/प्र.क्र.१५८/मातं, दि. २४/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७२४१८१४३२५९०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-07-2025 20:56:24
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस महासंचालक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / नियोजन व समन्वय / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

२/- कार्यासन अधिकारी, का.क्र.२५ यांना माहितीकरीता व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रांबाबत सूचना.....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- मलेअ-१७२५/प्र.क्र.१५८/मातं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई, ४०००३२
दिनांक - २४ जुलै, २०२५.

<u>संदर्भ</u> - १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९ जानेवारी, २०१८.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आसेकें-१७२६/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७.३.२०२५
३. शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मातंसं-०४८/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७.३.२०२५

**<u>प्रस्तावना</u> -**

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथे नमूद दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या CSC २.० मधील मार्गदर्शक सूचनांनुसार आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्याचे निकष, कार्यपध्दती व इतर बाबींसदर्भात विस्तृत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तदनंतर शुध्दिपत्रक दि.०३.०६.२०२५ अन्वये शासन निर्णय दि.१९.०१.२०१८ मधील काही निकषांत सुधारणा करण्यात येऊन संदर्भ क्र.२ येथे नमूद शासन निर्णय दि.१७ मार्च, २०२५ अन्वये आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुप्पट करण्यास, सेवेच्या दरात वाढ करण्यास तथा घरपोच सेवा देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आपले सरकार सेवा केंद्रांच्या अनुषंगाने महालेखापाल, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालय यांनी त्यांच्या लेखापरीक्षणांमध्ये आपले सरकार सेवांच्या कामगिरीबाबत काही त्रुटी उपस्थित केल्या असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्याचे सूचित केले आहे. त्यास अनुसरुन हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे..

**<u>शासन परिपत्रक-</u>**

आपले सरकार सेवा केंद्रांवरील सेवांबाबत शासनस्तरावर विविध तक्रारी/निवेदने मा.विधानसभा सदस्य यांचेकडून प्राप्त होत आहेत. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात:-

१) राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना सूचना देण्यात येत आहेत की, त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व जिल्ह्यामध्ये स्थित आपले सरकार सेवा केंद्रांच्या कामगिरीचे वार्षिक गुणवत्ता निर्धारण जिल्हाधिकारी करीत आहेत, याची सुनिश्चिती करण्यासाठी योग्य सुधारात्मक उपाय योजावेत.

२) संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद दिनांक १९.०१.२०१८ शासन निर्णयातील परि.क्र.७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत. त्यानुसार आपले सरकार सेवा केंद्रांच्या गुणवत्तेचे मुल्यमापन करुन प्रत्येकी वर्षी ३१ जानेवारी पूर्वी अ, ब, क व ड श्रेणी निश्चित करण्यात यावी. सेवा केंद्रांचे मुल्यमापन करतांना मुल्यमापन कालावधीत व्यवहारांची संख्या, सेवा विविधतेचे प्रकार व संख्या, नागरिकांशी सौजन्याने वागणे, डिजिटल पेमेंटला प्राधान्य देणे, असे मुद्दे जिल्हाधिकारी यांनी विचारात घ्यावे.

३) नगर पंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांकडून (पूर्वीचे नाव नागरी सुविधा केंद्रे) नागरिकांना उत्तम सेवा मिळणेसाठी योग्य सुधारात्मक उपाय करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रांच्या कामगिरीचे वार्षिक गुणवत्ता निर्धारण नगर पंचायत करीत आहेत, ह्याची सुनिश्चिती करण्यासाठी तसेच अर्ज प्रलंबित राहण्याच्या कारणांचा आढावा घेण्यासाठी नगर विकास विभागाने शासनस्तरावर मा.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनांनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

४) ग्राम पंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांकडून (पूर्वीचे नाव संग्राम केंद्रे) नागरिकांना उत्तम सेवा मिळणेसाठी योग्य सुधारात्मक उपाय करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रांच्या कामगिरीचे वार्षिक गुणवत्ता निर्धारण ग्राम पंचायती करीत आहेत, ह्याची सुनिश्चिती करण्यासाठी तसेच, अर्ज प्रलंबित राहण्याच्या कारणांचा आढावा घेण्यासाठी ग्राम विकास विभागाने शासनस्तरावर मा.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनांनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

५) सेवांसाठीचे शुल्क यासारखी आवश्यक माहिती व आपले सरकार सेवा केंद्रांची सूची संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे याची सुनिश्चिती प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाने करावी. यासाठी आवश्यक तेथे मिडीयाचा वापर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संकेतांक २०२५०७२४१८१४३२५९०७ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

EKNATH KASHINATH GAGARE

Digitally signed by EKNATH KASHINATH GAGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=General Administration Dep., 2.5.4.20=D9A3CCBC053D2CF9B4C30C85BB8DB0E6C39331B90D48B0ABA6CDE387B5EC208C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC79F4A08CA2D5D74E02E7214F6AAD4EF7D9AFDEBA5BFCDEF24D45049099939, cn=EKNATH KASHINATH GAGARE
Date: 2025.07.24 18:16:29 +05'30'

**(एकनाथ गागरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
६) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७) विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८) विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
१०) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
११) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१२) प्रबंधक,उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,

१४) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१९) सर्व पोलीस आयुक्त,

२०) सर्व विभागीय आयुक्त,

२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,

२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

२४) सर्व जिल्हाधिकारी,

२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,

२७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,

२८) सर्व मंत्रालयीन विभाग,

२९) सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण,मुंबई,

३०) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

३२) निवडनस्ती (का.मातं).